नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ११२ Issue - 112 | वार मंगळवार दि. ९ सप्टेंबर २०२५ Blow- Tuesday Date 9 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मराठा आरक्षणाविरोधात ओबीसींचा एल्गार

## जीआर वरुन वातावरण तापलं, दोन आघाड्यांवर लढण्याचा निर्धार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मराठा आरक्षणाचा राज्य सरकारने काढलेल्या जीआर संदर्भात विदर्भातील ओबीसी समाजामध्ये असंतोष वाढताना दिसत आहे. शनिवारी नागपूरमध्ये झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत ओबीसी चळवळीशी संबंधित विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नेते एकत्र आले. जवळपास दोन तास चाललेल्या चर्चेमध्ये राज्य सरकारच्या निर्णयामुळे ओबीसींच्या अधिकारांना बाधा पोहोचू शकते, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे. बैठकीनंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. त्यांनी सांगितले की, 'पहिला जीआर हा पात्र लोकांना न्याय देणारा होता. पण दुसरा जीआर काढून पात्रांना बाजूला टाकण्यात आलं आणि सरसकट दाखल्याच्या आधारे पात्रता देण्याचा मार्ग उघडला. यामुळे मूळ ओबीसी समाजावर अन्याय होतोय,' असे मत वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

वडेट्टीवार पुढे म्हणाले की, 'ज्यांच्या नोंदी कुणबी म्हणून आहेत, त्यांना आरक्षणाबाबत कोणीही आक्षेप घेतलेला नाही. मात्र सरसकट दाखले मान्य करण्याचा निर्णय घेतल्यामुळे ओबीसी समाजात चिड आणि नैराश्य निर्माण झालं आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही दोन आघाड्यांवर लढाई लढण्याचा निर्णय घेतलाय, एक न्यायालयीन आणि दुसरी रस्त्यावर आंदोलनाच्या स्वरूपात.'

या बैठकीतून विदर्भ पातळीवर एक कमिटी स्थापन करण्याचं ठरलं आहे. ही कमिटी जीआरचा अभ्यास करून न्यायालयीन लढाईसाठी भूमिका ठरवेल, तसेच मोठा मोर्चा नागपूरमध्ये काढण्याची आखणी करेल. 'आरक्षणावर कुठलीही ठेच लागू नये आणि ओबीसींच्या हक्काला बाधा पोहोचू नये, हीच आमची मुख्य भूमिका आहे,' असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने काही वेगळी भूमिका घेतली असली तरी वडेट्टीवार यांनी ती सडेतोड शब्दांत फेटाळली. ते म्हणाले, ज्या जीआरमुळे ओबीसींचं प्रचंड नुकसान होणार आहे, त्याला आमचा विरोध आहे. कोणाला नुकसान व्हावं असं वाटत असेल तर ती त्यांची भूमिका असेल, पण ती ओबीसी बांधवांना पटणारी नाही. या बैठकीत सर्व कार्यकर्त्यांनी स्पष्ट मान्य केलं की, सरकारच्या या निर्णयाने अन्याय होणार आहे.

बैठकीत सहभागी झालेल्या अनेक संघटनांनीही आपली चिंता व्यक्त केली. त्यांचं म्हणणं होतं की, 'राज्य सरकारच्या या पावलामुळे आरक्षणाची खरी संकल्पना धोक्यात येईल आणि ओबीसींना मिळणारे हक्क हिरावले जातील.' यामुळे पुढील काळात न्यायालयीन मार्गासोबतच रस्त्यावर उतरून सरकारला इशारा देण्याची तयारी ओबीसी नेत्यांनी दाखवली आहे.

नागपूरच्या बैठकीनंतर विदर्भातील ओबीसी नेत्यांनी सरकारला कठोर इशारा दिला आहे. 'ओबीसींच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रयत्न झाला, तर तीव्र आंदोलन उभारलं जाईल,' असा निर्धार व्यक्त करून त्यांनी आगामी संघर्षाचं वेळापत्रक आखण्याची तयारी सुरू केली आहे. तर दुसरीकडे, सरकारने यापूर्वी स्पष्ट केलं होतं की कुठल्याही समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्याला देण्यात आलेले नाही. महसूलमंत्री चंद्रशेखर बवनकुळे यांनी याच विषयावर सांगितलं होतं की, 'ज्या व्यक्तींच्या जुन्या नोंदी कुणबी म्हणून आहेत त्यांनाच त्याचा लाभ मिळणार आहे. काहीजण संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.' एकीकडे ओबीसी नेते न्यायालयीन आणि रस्त्यावरची लढाई लढण्याची तयारी दाखवत आहेत, तर दुसरीकडे सरकारचा दावा आहे की, या निर्णयामुळे कुठल्याही समाजाला हानी पोहोचणार नाही. आगामी काळात या संघर्षाचा काय परिणाम होतो, याकडे राज्याचे लक्ष लागून राहणार आहे.

# उपराष्ट्रपती पदासाठी आज मतदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानं उपराष्ट्रपती निवडणूक जाहीर झाली आहे. उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी सत्ताधारी एनडीएकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी निवडणुकीच्या रिंगणात आहेत. २०१७ च्या उपराष्ट्रपती निवडणुकीत णझ ला आणि २०२२ मध्ये एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा दिलेल्या नवीन पटनाईक यांच्या बिजू जनता दलानं उपराष्ट्रपती निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन पटनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ७ राज्यसभा खासदारांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर निवडणुकीत मतदान न करण्याचा निर्णय झाला.

बिजू जनता दलाचे खासदार सस्मित पात्रा यांनी मीडियासोबत बोलताना म्हटलं की बिजू जनता दलानं उद्या होणाऱ्या उपराष्ट्रपती निवडणुकीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. बीजेडी एनडीए आणि इंडिया या दोन्ही आघाड्यांना समान अंतरावर ठेवेल. आमचं लक्ष्य ओडिशा आणि ओडिशाच्या साडे चार कोटी लोकांच्या विकास आणि कल्याणावर केंद्रीत आहे.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसंदर्भात बिजू जनता दलाची भूमिका बदलती राहिली आहे. २०१२ मध्ये बिजू जनता दलानं मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला होता. २०१७ मध्ये बीजेडीनं विरोधी पक्षांच्या म्हणजेच यूपीएच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता. २०२२ च्या उपराष्ट्रपती निवडणुकीत एनडीएचे उमेदवार म्हणजेच जगदीप धनखड यांना पाठिंबा दिला होता. आता २०२५ च्या उपराष्ट्रपती निवडणुकीत बीजेडीनं मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसोबत ओडिशाची विधानसभा निवडणूक झाली होती. त्या दोन्ही निवडणुकीत बीजेडीचा दारुण पराभव झाला होता. केंद्रीय आदिवासी मंत्री जुएल ओराम यांनी बीजेडीच्या मतदानापासून दूर राहण्याच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. हा अप्रत्यक्षपणे एनडीए उमेदवाराला पाठिंबा असल्याचं ते म्हणाले. उपराष्ट्रपती पदासाठी मतदान ९ सप्टेंबरला सकाळी १० वाजता सुरु होईल आणि ५ वाजता संपेल. उपराष्ट्रपती निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार मतदान करतात. लोकसभेतील ५४२ आणि राज्यसभेतील २४० खासदारांना मतदानाचा अधिकार आहे. ७८२ खासदार मतदान करु शकतात. त्यामुळं या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी ३९२ खासदारांची मतं मिळणं आवश्यक आहे. सरकारकडे ४२७ खासदारांचा पाठिंबा आहे. ज्यामध्ये लोकसभेतील २९३ आणि राज्यसभेतील १३४ खासदारांचा समावेश आहे. तर विरोधी पक्षांकडे ३५५ खासदार आहेत. यामध्ये लोकसभेतील २४९ तर राज्यसभेत १०६ खासदार आहेत. इंडिया आघाडी वगळता विरोधी पक्षात असणाऱ्या काही पक्षांचा मतदान कुणाला करणार याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

# सिडको जमीन घोटाळा प्रकरणाची चौकशी होणार, सरकारकडून एसआयटीची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सरकारी वनजमिनी बळकवल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने डखढ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय म्हणजे सिडको जमीन घोटाळ्यात महत्वपूर्ण पाऊल असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार (ठेहळीं झरुरी) यांनी व्यक्त केले आहे. याप्रकरणी पाठपुरावा करणारे स्थानिक भूमिपुत्र तसेच कॉन्शियस सिटीझन फोरम यांसारख्या सामाजिक संघटनांचे हे यश असून सर्वांचेच रोहित पवारांनी अभिनंदन केले आहे.

नवी मुंबईतील सिडकोकडून ५ हजार कोटी रुपयांच्या वनजमीन घोटाळा प्रकरणाची देखील एसआयटीकडून चौकशी होणार आहे. आमदार रोहित पवार यांच्याकडून मुख्य सचिव राजेशकुमार मीना यांची भेट घेतल्यानंतर तत्काळ राज्य सरकारच्या वन विभागाकडून एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. आम्ही सादर केलेले तब्बल १२ हजार पानांचे पुरावे, सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चाधिकार समितीने राज्याच्या मुख्य सचिवांना चौकशी करण्याबाबतचं लिहिलेलं पत्र आणि आता राज्य सरकारने डखढ स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय अशाप्रकारे चोहोबाजूने मजबूत सापळा लागत आहे. परंतु मागील काळात वेगवेगळ्या प्रकरणात स्थापन झालेल्या डखढ चा इतिहास बघता केवळ वेळ मारुन नेण्याचे प्रकार झाले आहेत. मात्र या प्रकरणात भ्रष्टाचारी मंत्र्याला कितीही संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला तरी आम्ही कोणत्याही भ्रष्ट माशाला या प्रकरणातून सुटू देणार नाही . आरोपी नंबर २ बिवलकर महाराष्ट्रातच असून लवकरच देश सोडणार असल्याची माहिती आहे. त्यामुळं बिवलकर देशाबाहेर पळून जाण्यापूर्वी लुकआउट नोटीस देऊन अटक करणे गरजेचं आहे. आम्ही एवढी स्पष्ट माहिती देऊनही उद्या बिवलकर देशाबाहेर गेल्यास राज्याचे मुख्यमंत्री त्यासाठी पूर्णपणे जबाबदार असतील असे रोहित पवार यांनी म्हटलं आहे. उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी राज्याला ओरबाडून खाणाऱ्या या भ्रष्ट मंत्र्यांचा राजीनामा घेऊन भ्रष्टाचारी मंत्र्यांची गय केली जाणार नाही हे मुख्यमंत्री दाखवून देतील का? की अशा भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून पुन्हा राज्याला लुटायला मोकळं सोडतील? असा सवाल रोहित पवार यांनी केलाय. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाची महाराष्ट्र वाट बघत आहे. असो, काहीही झालं तरी हा विषय आपण मार्गी लावणारच, त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांनी आणि कुळधारकांनी कुठलीही काळजी करू नये असे रोहित पवार म्हणाले.

# काँग्रेसचा विरोधी पक्षनेतेपदासाठी 'सतेज' धावा अन् मनसे एन्ट्रीवर 'राज' मंथन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. या दोन्ही पदांसाठी महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट यांच्यामध्ये चढाओढ सुरू आहे. त्यामुळे विधान परिषदेमध्ये काँग्रेसकडून दावा करण्यात आला आहे, तर विधानसभेमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून दावा करण्यात आला आहे. आज काँग्रेस नेत्यांनी मातोश्रीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आणि विविध मुद्यांवर चर्चा केली.

या भेटीमध्ये विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदासह राज ठाकरे यांच्या संभाव्य महाविकास आघाडीतील एन्ट्रीवरही चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. त्याचबरोबर आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीसंदर्भातही उभय पक्षांच्या नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. दरम्यान, या बैठकीमध्ये उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या एकत्र येण्यावर काँग्रेस नेत्यांसोबत चर्चा केल्याची माहिती आहे.

# लालबागचा राजा मंडळाविरोधात मुख्यमंत्र्यांकडे मच्छीमार कृती समितीची तक्रार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : लालबागचा राजा सार्वजनिक गणेश मंडळ विरोधात तक्रार करण्यात आली आहे. मच्छिमार कृती समितीकडून ही तक्रार करण्यात आली आहे. विसर्जन प्रक्रियेवेळी झालेल्या गोंधळामुळे लालबागच्या राजाचं विसर्जन चंद्रग्रहणाच्या काळात झालं. यामुळे लाखो गणेश भक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, असा आरोप मच्छिमार कृती समितीने केला आहे. तसेच लालबागला दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचा मानसिक आणि शारीरिक छळ होत असल्याचा देखील आरोप समितीने केला आहे. अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी ई-मेलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. त्यांनी या पत्रात लालबागच्या मंडळाच्या कार्यकारी मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.


लालबागच्या राजाच्या विसर्जनाचा प्रसंग काल आपण सर्वांनी पाहिला. त्या विसर्जनाच्या प्रक्रियेत जो काही घोळ झाला आहे, त्या विरोधात आम्ही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे लेखी तक्रार केली आहे. या तक्रारीत हा जो घोळ झाला आहे, त्याची शहानिशा आणि चौकशी करण्याची विनंती केली आहे, अशी माहिती देवेंद्र तांडेल यांनी दिली. मूळ कारण असं आहे की, लालबागचा राजा मंडळाने हिंदू धर्मीयांच्या भावना दुखावल्या आहेत. कारण लालबागच्या राजाचं विसर्जन चंद्रग्रहणाच्या काळात केलं आहे. हे करताना त्यांनी कोळी बांधवांचं देखील मनं दुखावली आहेत. कारण आतापर्यंत कोळी बांधव नेहमीप्रमाणे लालबागच्या राजाचे विसर्जन करत आले आहेत. दुर्दैवाने या वर्षी त्यांना कोणताच मान देण्यात आलेला नाही. त्याचंच फलित विसर्जनाच्या दिवशी पाहायला मिळालं, अशी टीका देवेंद्र तांडेल यांनी केली. आमच्या तक्रारीत आम्ही हा मुद्दा उपस्थित करताना इतर मुद्देही घेतले आहेत. भाविकांना ज्या पद्धतीने वागणूक दिली जात आहे, आपण जे व्हिडीओ पाहत आलेलो आहोत ते पाहता कुठेतरी याचा अंतर झाला पाहिजे. व्हीआयपी कल्चर थांबलं पाहिजे. लालबागचा राजा हा सगळ्यांचा बाप्पा आहे. हा कुणी एका शेठचा गणपती नाही. त्यामुळे तातडीने यावर कारवाई झाली पाहिजे, उपाययोजना झाल्या पाहिजेत आणि एसओपी तयार झाल्या पाहिजेत, अशी मागणी देवेंद्र तांडेल यांनी केली.

**संशोधकांना आता सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा** | **इतर कॅन्सरवरील लसींचेही संशोधन सुरु**

# रशियाने कॅन्सरवर मात करणारी लस बनवली, सर्व चाचण्या यशस्वी झाल्याचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : रशियाने कॅन्सरवर मात करणारी लस तयार केल्याची माहिती समोर आली आहे. रशियातील फेडरल मेडिकल अँड बायोलॉजिकल एजन्सीने कॅन्सरवरील लस तयार केली आहे. रशियन एंटरोमिक्स कॅन्सर मात करणारी लस आता वापरासाठी तयार आहे. चठछ-आधारित या लसीने सर्व प्रीक्लिनिकल चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या असून तिची सुरक्षितता व परिणामकारकता सिद्ध झाली आहे. या लसीचा प्रारंभीचा उद्देश कोलोरेक्टल कॅन्सर (कोलन कॅन्सर) वर उपचार करणे हा असेल, असं ऋच्इ च्या प्रमुख वेरोनिका स्कोर्सोव्हा यांनी सांगितलं आहे. रशियाच्या TSS वृत्तसंस्थेच्या रिपोर्टनुसार, या कॅन्सर लसीने उत्तमपणे रिझल्ट दिले आहेत. FMB प्रमुख वेरोनिका स्कोर्सोव्हा यांनी याबाबतची घोषणा ईस्टर्न इकॉनॉमिक फोरम मध्ये केली.

स्कोर्सोव्हा म्हणाल्या, ही संशोधनप्रक्रिया अनेक वर्षे चालली, ज्यामधील मागील तीन वर्षे केवळ आवश्यक प्रीक्लिनिकल अभ्यासासाठी दिली गेली. लस आता वापरासाठी तयार आहे. आम्ही अधिकृत मान्यतेची प्रतीक्षा करत आहोत. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, , प्रीक्लिनिकल चाचण्यांनी या लसीची सुरक्षितता तसेच वारंवार वापरानंतरही टिकून राहणारी परिणामकारकता याची खात्री दिली आहे. या दरम्यान संशोधकांनी ट्यूमरचा आकार घटताना व त्याच्या वाढीचा वेग कमी होताना पाहायला मिळाला. याशिवाय, लसीमुळे रुग्णांच्या जिवंत राहण्याच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे अभ्यासातून दिसून आले.

रशियाने बनवलेल्या या लसीचं पहिलं लक्ष्य कोलोरेक्टल कॅन्सर असला तरी, ग्लिओब्लास्टोमा (ब्रेन कॅन्सर) आणि विशिष्ट प्रकारच्या मेलेनोमासाठी, विशेषतः ऑक्युलर मेलेनोमा (डोळ्याचा एक प्रकारचा कॅन्सर) यासाठीही लसी तयार करण्याच्या दिशेने आशादायक प्रगती झाली आहे. या लसी सध्या त्यांच्या प्रगत टप्प्यात आहेत. दहावे ईस्टर्न इकॉनॉमिक फोरम (एएऋ) ३ ते ६ सप्टेंबरदरम्यान व्लादिवोस्तोक येथे "The Far East: Cooperation for Peace and Prosperity' या विषयावर पार पडले. या व्यासपीठावर ७५ हून अधिक देश व प्रदेशांतील ८,४०० हून अधिक सहभागी उपस्थित होते.

## संपादकीय....

# ओबीसींचा एल्गार

मराठा आरक्षणाचा राज्य सरकारने काढलेल्या जीआर संदर्भात विदर्भातील ओबीसी समाजामध्ये असंतोष वाढताना दिसत आहे. शनिवारी नागपूरमध्ये झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत ओबीसी चळवळीशी संबंधित विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नेते एकत्र आले. जवळपास दोन तास चाललेल्या चर्चेमध्ये राज्य सरकारच्या निर्णयामुळे ओबीसींच्या अधिकारांना बाधा पोहोचू शकते, अशी भावना व्यक्त करण्यात आली आहे. बैठकीनंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. 'पहिला जीआर हा पात्र लोकांना न्याय देणारा होता. पण दुसरा जीआर काढून पात्रांना बाजूला टाकण्यात आलं आणि सरसकट दाखल्याच्या आधारे पात्रता देण्याचा मार्ग उघडला. यामुळे मूळ ओबीसी समाजावर अन्याय होतोय,' असे वडेट्टीवर म्हणाले 'ज्यांच्या नोंदी कुणबी म्हणून आहेत, त्यांना आरक्षणाबाबत कोणीही आक्षेप घेतलेला नाही. मात्र सरसकट दाखले मान्य करण्याचा निर्णय घेतल्यामुळे ओबीसी समाजात चिड आणि नैराश्य निर्माण झालं आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही दोन आघाड्यांवर लढाई लढण्याचा निर्णय घेतलाय, एक न्यायालयीन आणि दुसरी रस्त्यावर आंदोलनाच्या स्वरूपात.' या बैठकीतून विदर्भ पातळीवर एक कमिटी स्थापन करण्याचं ठरलं आहे. ही कमिटी जीआरचा अभ्यास करून न्यायालयीन लढाईसाठी भूमिका ठरवेल, तसेच मोठा मोर्चा नागपूरमध्ये काढण्याची आखणी करेल. 'आरक्षणावर कुठलीही ठेच लागू नये आणि ओबीसींच्या हक्काला बाधा पोहोचू नये, हीच आमची मुख्य भूमिका आहे,' असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने काही वेगळी भूमिका घेतली असली तरी वडेट्टीवार यांनी ती सडेतोड शब्दांत फेटाळली. ते म्हणाले, ज्या जीआरमुळे ओबीसींचं प्रचंड नुकसान होणार आहे, त्याला आमचा विरोध आहे. कोणाला नुकसान व्हावं असं वाटत असेल तर ती त्यांची भूमिका असेल, पण ती ओबीसी बांधवांना पटणारी नाही. या बैठकीत सर्व कार्यकर्त्यांनी स्पष्ट मान्य केलं की, सरकारच्या या निर्णयाने अन्याय होणार आहे. बैठकीत सहभागी झालेल्या अनेक संघटनांनीही आपली चिंता व्यक्त केली. त्यांचं म्हणणं होतं की, 'राज्य सरकारच्या या पावलामुळे आरक्षणाची खरी संकल्पना धोक्यात येईल आणि ओबीसींना मिळणारे हक्क हिरावले जातील.' यामुळे पुढील काळात न्यायालयीन मार्गासोबतच रस्त्यावर उतरून सरकारला इशारा देण्याची तयारी ओबीसी नेत्यांनी दाखवली आहे. नागपूरच्या बैठकीनंतर विदर्भातील ओबीसी नेत्यांनी सरकारला कठोर इशारा दिला आहे.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना - ग्रामीण उद्योजकतेला चालना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारत सरकारने ग्रामीण भागातील असंघटित अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक स्वरूप देण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PMFME) सुरू केली आहे. ही योजना २०२०-२१ पासून सुरू आहे.

**योजनेचा उद्देश –**

– असंघटित अन्नप्रक्रिया उद्योगांना औपचारिक स्वरूप देणे

– उत्पादनात गुणवत्ता आणि मूल्यवर्धन करणे

– अन्न सुरक्षा मानकांचे पालन सुनिश्चित करणे

– ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण करणे

– शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे

आर्थिक सहाय्य–

– वैयक्तिक उद्योजकांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या ३५% पर्यंत अनुदान, जास्तीत जास्त ₹१० लाख

-SHGs, FPOs, सहकारी संस्था यांना मूल्य साखळीतील अन्नप्रक्रिया यंत्रणा उभारण्यासाठी अनुदान

– सामायिक पायाभूत सुविधा जसे की प्रक्रिया केंद्र, शीतगृह, गोदाम यासाठीही अनुदान

– पत संलग्न भांडवली अनुदान: प्रकल्प खर्चाच्या ३५% पर्यंत, जास्तीत जास्त ₹३ कोटी (प्रकल्प खर्च ₹१० कोटीपेक्षा जास्त नसावा)

ब्रँडिंग आणि मार्केटिंगसाठी सहाय्य–

– उत्पादनाच्या ब्रँडिंग व विपणनासाठी एकूण खर्चाच्या ५०% पर्यंत अनुदान

– पॅकेजिंग, मानकीकरण, गुणवत्ता नियंत्रणासाठी मदत

– प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ₹५ लाखांपर्यंत सहाय्य

**अन्य सुविधा–**

– उद्योजकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकास

– तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन

– बँक कर्ज जोडणीसाठी सहाय्य

**योजनेसाठी पात्रता –**

– असंघटित अन्नप्रक्रिया उद्योग

– वैयक्तिक सूक्ष्म उद्योजक

– स्वयं-सहायता गट (SHGs)

– शेतकरी उत्पादक गट (FPOs)

– सहकारी संस्था व उत्पादक सहकारी संस्था

योजनेअंतर्गत समाविष्ट उद्योग–

– फळे व भाजीपाला प्रक्रिया

– धान्य व कडधान्ये प्रक्रिया

– दुग्ध प्रक्रिया

– मांस व कुक्कुटपालन प्रक्रिया

– मत्स्य प्रक्रिया

– तेलबिया प्रक्रिया

– पेय व मसाले प्रक्रिया

आवश्यक कागदपत्रे

– आधार कार्ड, पॅन कार्ड

– बँक खाते तपशील

– व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास)

– प्रकल्प अहवाल

– जमीन/भाडेकरार दस्तऐवज

– भागीदारी करार किंवा संस्था नोंदणी (लागू असल्यास)

**अर्ज प्रक्रिया –**

इच्छुक उद्योजकांनी आपल्या जिल्हा किंवा तालुका स्तरावरील कृषी विभागाशी संपर्क साधावा किंवा अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावा. अर्ज प्रक्रिया संबंधित अन्नप्रक्रिया विभागामार्फत राबवली जाते.

PMFME योजना म्हणजे ग्रामीण भागातील अन्नप्रक्रिया उद्योगांना बळ देणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकरी, महिला गट, आणि स्थानिक उद्योजकांना आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि बाजारपेठे पर्यंत पोहोच मिळते. स्वावलंबन आणि गुणवत्ता यांचा संगम साधणारी ही योजना ग्रामीण भारताच्या विकासासाठी एक मजबूत पायाभूत व्यवस्था निर्माण करत आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**सोलापूर**

# अक्कलकोट येथे ईद-ए-मिलादुन्नबी पैगंबर जयंती निमित्त रक्तदान शिबिर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सर्व जगाला शांतीचे संदेश देणारे शांतिदूत प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम समाज यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याच सामाजिक कार्याचा भाग म्हणून रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले व शिबिर यशस्वीपणे संपन्न झाले.

या शिबिराला अक्कलकोट शहर व तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त व मोठा प्रतिसाद लाभला असून तब्बल २२३ रक्तदात्याने रक्तदान केले.

**ईद-ए-मिलादुन्नबी, पैगंबर जयंती निमित्त ठेवण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला प्रथमच वर्षी मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या यापुढेही अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम समाज टीम मार्फत असेच सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील.**

**– सोहेल फरास सामाजिक कार्यकर्ते अक्कलकोट**


अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम समाज यांनी आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिराचे रक्तदात्यानी व नागरिकांनी या रक्त दान शिबीर उपक्रमाचे मनापासून स्वागत करत कौतुक ही केले.

रक्त दान शिबिराला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली भेट देणारे मान्यवर सैयद शाह दातापी रशाह कादरी, सैयद शाह मस्तुर शाह कादरी, अब्दुल रऊफ पीरजादे साहेब, सय्यद मुद्दसर पीरजादे साहेब, सय्यद खालील पाशा कादरी पीरजादे, सद्दाम शेरीकर, ननु कोरबु, अशपाक बळोरगी, अविराज सिद्धे, पत्रकार अशपाक मुल्ला, मतीन पटेल, अतीक बागवान, रजाक सय्यद, इरफान दावना, बुडन तांबोळी, मुसा बागवान इरफान कोरबु, मुबारक कोरबु, मोहसीन मोकाशी,नावीद डांगे आदी मान्यवरांनी रक्तदान शिबिरास भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

रक्तदान शिबिराला मौलाना इब्राहिम, मौलाना सरफराज, अजीज शेख सर,अली पेशमाम, अयुब मल्लेभारी, रफिक उस्ताद, सिद्धेश्वर ब्लड बँक चे प्रमुख सादिक मुजावर यांचे मार्गदर्शन लागले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी युसुफ कन्नी, समीर शेख, सैपन शेख, ज्योतिबा पारखे, आयुब मल्लभारी, नूरू जवळगीकर, रुक्मोदिन खिस्तके, साकिब खिस्तके, अशरफ गोलंदाज, साजिद डांगे, अखिल फुलारी, इलियास शेख यांनी सहकार्य केले रशीद खिस्तके, सोहेल यांनी मोलाचे कार्य केले. शेवटी रक्तदात्यांचे व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार. सामाजिक कार्यकर्ता सोहेल फरास यांनी मानले.

# जोगन चिंचोली गोटेवाडी गावच्या विकासासाठी प्रयत्न शिल असलेले सरपंच सिंधुताई कोंडमगीरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील जोगन चिंचोली गोटेवाडी गावच्या कर्तव्यदक्ष विकासाभिमुख नेतृत्व असलेली रणरागिणी सिंधुताई कोंडमगीरे यांनी ग्रामपंचायतच्या माध्यमातुन अनेक विकासकामे करत जोगन चिंचोली व गोटेवाडी गावाची जनता आपल दैवत मानुन जे.जे.नव ते.ते. माझ्या गावला हव या युक्ती प्रमाने गावचा विकास करण्यासाठी सदैव धडपडणारे सरपंच मनुन सिंधुताई कोंडमगीरे यांच्याकडे पाहीलं जातं.

स्वतः महिला सरपंच म्हणून काम करत असताना गावातील महिलांना सक्षम करण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातुन ग्रामपंचायत अंतर्गत माझ्या गावातील महिला सक्षमीकरण झाल पाहीजे यासाठी प्रयत्नशिल असलेली सरपंच सिंधुताई कोंडमगीरे यांनी ग्रामपंचायतच्या माध्यमातुन गाव अंतर्गत सिमेंट रस्ते, शेतकरी हितासाठी शेतरस्ते, गावात समाज मंदिर, गोटेवाडी जोगन चिंचोली गावचा पाणी प्रश्न मीटावा यासाठी जलजिवन मिशन योजनेचे काम प्रगती पथावर असुन गावातील शेतकरी सुजलाम सुफलाम व्हावा व शेतकर्यांना पाणीटंचाई भासु नये यासाठी मनरेगा अंतर्गत दहा ते पंधरा सिंचन विहीरी देण्यात आल्या व मनरेगा अंतर्गत शेतकर्यांना सात गोटे देण्यात आले. त्यानंतर हनूमान मंदीर व समाज मंदिरा समोरील ग्राउंडला सिमेंट ग्राउंड बनवन्यात आल असुन गाव अंतर्गत रस्त्याच्या बाजुला नाली बांधकाम.व गरजु ग्रामस्थांना हक्काच घर मीळावे यासाठी दहा ते पंधरा लाभार्थ्यांना घरकुल देण्यात आल असुन आणखी घरकुल बांधकाम प्रगतिवर आसल्याचे सरपंच सिंधुताई कोंडमगीरे यांनी सांगितले. जोगन चिंचोली गोटेवाडी गावची जनता आमच दैवत मानुन आम्ही ग्रामपंचायत माध्यमातुन ग्राम सेवा करत आहोत. गावातील सर्वसामान्यांना शासन योजनेचा लाभ मीळावा अन गावचा विकास व्हावा यासाठी जनसेवा हाच ध्यास मनाशी बाळगुन सरपंच सिंधुताई कोंडमगीरे गावातील विकास कामे व गावची सेवा करत आहेत.

# नळदुर्ग वागदरी व परिसरात मिरवणुकीने गणरायाला निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग वागदरी व परिसरात भव्य गणेश विसर्जन मिरवणूकीने व मोर्या मोर्या गणपती बाप्पा मोर्या पुढच्या वर्षी लवकर या असा गजर करीत चौका चौकात डॉब्लिच्या तालावर लेझीम पथक, टिपरी पथकांच्या खेळाचे सादरीकरण करत भक्तीमय उत्साही वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला.

नळदुर्ग येथे डॉल्बीच्या निनादात ढोल तस्याच्या गजरात हालगीच्या कडकडाटात लेझीम संघ,टिपरी पथकाचे पाऊल खेळत मोठ्या उत्साही भक्तीमय वातावरणात शहरातील प्रमुख गणेश मंडळाने विसर्जन मिरवणूक काढून गणरायाला निरोप दिला.या मध्ये शिवशाही गणेश तरुण मंडळ, धर्मवीर संभाजी तरुण गणेश मंडळ, नवचैतन्य गणेश तरुण मंडळ, न्यू चैतन्य गणेश तरुण मंडळ, भोईराज गणेश तरुण मंडळ, जय भवानी गणेश तरुण मंडळ जय हनुमान, जय हनुमान गणेश तरुण मंडळ, शिवनेरी गणेश मंडळ, जय हिंद गणेश तरुण मंडळ, जवाहर गणेश तरुण मंडळ, इंदिरानगर गणेश मंडळ, माऊली नगर गणेश तरुण मंडळ हे शहरातील प्रमुख गणेश मंडळ विसर्जन मिरवणूक सहभागी झाले होते.

तर नळदुर्ग येथून जवळच अंतरावर असलेल्या वागदरी येथे गणेश मंडळाच्या वतीने गणरायाची विसर्जन मिरवणूक काढून. गणपतीला निरोप देण्यात आला. शेवटी महाप्रसादाने गणेशोत्सवाची सांगता करण्यात आली. मिरवणुकीमध्ये गावातील समस्त ग्रामस्थ सहभागी झाले होते

तसेच बोळेगाव ता.तुळजापूर येथे श्री गणेश मित्र मंडळाच्या वतीने बसविण्यात आलेल्या गणेश मुर्तीचे वाजात गाजत मोठ्या उत्साही वातावरणात विसर्जण करून गणती बाप्पा मोरय्या पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करित गणरायाला निरोप देण्यात आला.

गणेश उत्सव निमित्तने बोळे गाव येथे महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते.

शेवटी सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते गावातील मान्यवारांच्या प्रमुख उपस्थित गणेश मुर्तीचे पूजन व आरती करून सहवाद्द भव्य विसर्जन मीरवणूक काढून गणरायाला निरोप देण्यात आला. या प्रसंगी लहान मुला मुलींनी विविध गाण्यावर सुंदर नृत्य सादर करून ग्रामस्थ भाविकभक्तांची मने जिंकली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष भावेश लिंबाजी मदने, अमर रुपनूर,राजेंद्र रूपनूर,अभिषक सुर्यवंशी, गौरव सुर्यवंशी, श्रीमंत सुतार, परमेश्वर पोतदार,गणेश सुनील सूर्यवंशी आगंद जाधव गायकवाड,चिमाजी रुपनूर, संगीता सुरवसे सह ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होतो.

## रोटरी क्लब ऑफ सोलापूरचा अभिनव उपक्रम

# रोटरी क्लब ऑफ सोलापूर आयोजित आरोग्य तपासणी शिबिरांमधून गणेश भक्तांची सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : रोटरी क्लब ऑफ सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश उत्सवात घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरातून गणेश भक्तांची सेवा करण्यात आली.




भवानी पेठ येथील नेताजी युवक संघटना गणेश मंडळ, जोडभावी पेठ मध्ये घेण्यात आलेल्या शिबिरात १८० भक्तांची, चैतन्य मित्र मंडळ भवानी पेठ भाजी मार्केटच्या शिबिरात ९२ जणांची, शिवम मित्र मंडळ, भवानी पेठच्या शिबिरात ११६ जणांची, श्री. ओम शांती मित्र मंडळ, जुना विडी घरकुलच्या शिबिरात १०० जणांची, श्रीकृष्ण मित्र मंडळ, भवानी पेठच्या शिबीरात १०४ भक्तांची, इंदिरा वसाहत मित्र मंडळ भवानी पेठच्या शिबिरात ८३ भक्तांची, श्री छत्रपती शिवाजी महाराज सोसायटी गणेश मित्र मंडळ गोंधळे वस्तीच्या शिबिरात ११२ भक्तांची, श्री. विघ्नहर्ता सांस्कृतिक मंडळच्या शिबिरात, वीर गणपती अवंती नगरच्या शिबिरात ८२ गणेश भक्तांची मोफत आरोग्य तपासणी शिबिरातुन सेवा करण्यात आली. एकूण ८६९ भक्तांनी आयोजित आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. शिबिरात भक्तांच्या शुगर, हिमोग्लोबिन, आय. सी.टी.सी.आदी रक्ताच्या तपासण्या, रक्तदाब, वजन तपासले, कुटुंबनियोजन साधनांचे वाटपकरण्यात आले व आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर, सचिव निलेश फोफलिया, सुनील डागा, संतोष कनेकर, संदीप जव्हेरी, ब्रिजकुमार गोयदानी, सुनील माहेश्वरी, रेवणसिद्ध कापसे, माजी प्रांतपाल डॉ. राजीव प्रधान फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदींच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. सिद्धाराम चोरमुले, लॅब टेक्निशन व्यंकटेश कंची, सत्यभामा कांबळे, सोशल वर्कर आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, परिचारिका सुकेशनी सोनकांबळे, करण खानापुरे, वालचंद समाजकार्य प्रथमवर्षे विद्यार्थी, जिज्ञासा महानगर सोलापूरचे विद्यार्थी आदींनी आरोग्यतपासणी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतिने आयोजित धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे व माजी सैनिक यांचा विशेष सन्मापत्र व पदक देऊन सन्मान करण्याचे आयोजन केले जाणार असून प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन मुख्य आयोजक आंबेडकरी चळवळीचे युवा नेते तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केले आहे. शैक्षणिक, साहित्य, कला, पत्रकारिता, युवा कार्यकर्ता, सामाजिक व राजकिय कार्यामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींनी आपला प्रस्ताव खालील दिलेल्या व्हाट्सअप नंबर वर पाठवावा, किंवा खालील दिलेल्या पत्त्यावर पाठवावा, सदर प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख ३०/सप्टेंबर/२०२५ अंतिम तारीख आहे, तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना मेहकर जनसंपर्क कार्यालय मु.पो. मिलींद नगर वार्ड नं.१९, तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा पिन. नं-४४३३०१, व्हाट्सअप नंबर- मो.९९७०४६७१४१,९८८११९९८५२ या नंबरवर किंवा पत्त्यावर आपला प्रस्ताव पाठवावेत. सदर पुरस्कार हा दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये मेहकर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशोका हॉल मेहकर येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये वितरित केले जाणार आहे, पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे, आकर्षक ट्रॉफी, मेडल, सन्मानपत्र, शाल, थोर महापुरुषांच्या जिवनावर चारित्र्य पुस्तक असणार असून पात्र असलेल्यांनी प्रस्ताव पाठवावेत, सदर पाठवलेल्या प्रस्तावासाठी समितीचे सदस्य निर्णय घेणार आहे. यामध्ये कुणाल माने, शाहिर संघपाल गवई, राधेश्याम खरात, संदिप राऊत, लक्ष्मीताई कस्तुरे, प्रतिभाताई गवई, आसमा आत्राम, जाकेरा बी शेख आशी सुद्धा माहिती मुख्य आयोजक आंबेडकरी चळवळीचे युवा नेते तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर तालुक्यातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आमदार अभिजीत पाटील ॲक्शन मोडवर

## शेतकऱ्यांना पिककर्ज, शिक्षण कर्ज अशा विविध कर्जासाठी अडवणूक झाल्यास खपवून घेणार नाही : आमदार अभिजीत पाटील

**■ कर्जासाठी कसलीही अडचण आल्यास तात्काळ मला संपर्क करा मी शेतकरी, विद्यार्थी यांच्यासोबत आहे – आमदार अभिजीत पाटील.**

**■ दत्तक बँकांची अट न घालता शेतकऱ्यांना कर्ज देण्यात यावे**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तसेच माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी पंढरपूर पंचायत समिती शेतकी सभागृह येथे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी जनता दरबाराचे अयोजन करण्यात आले होते.

तसेच तालुका कर्जवाटप समिती आढावा बैठक आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी सर्व नॅशनल, सहकारी तसेच खासगी बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पीक कर्ज तसेच शिक्षण कर्ज, आण्णासाहेब पाटील, उमाजी नाईक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, संत रोहीदास अशा तब्बल १८ महामंडळांना कर्ज देण्यासाठी अडवणूक केल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, इथून पुढे शेतकऱ्यांना सिव्हिलची अट न घालता लवकरात लवकर सर्व कर्ज वाटप करण्यात यावे..

**जनतेच्या अडचणींवर थेट संवाद साधून तत्काळ निर्णय घेण्याची संधी नागरिकांना मिळाली. या माध्यमातून पंढरपूर तालुक्यातील नागरिकांच्या पिक कर्ज, आणि विविध प्रश्न आणि मागण्या प्राधान्याने सोडविण्याचे काम करणार आहे. तसेच शेतकऱ्यांना पिककर्ज, शिक्षण कर्ज अशा विविध कर्जासाठी अडवणूक झाल्यास खपवून घेणार नाही. दत्तक बँकांची अट न घालता शेतकऱ्यांना कर्ज देण्यात यावे. कर्जासाठी कसलीही अडचण आल्यास तात्काळ मला संपर्क करा मी शेतकरी, विद्यार्थी यांच्यासोबत असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.**

**– अभिजीत पाटील**
**आमदार, माढा**





कायमच चर्चेत राहिलेले आमदार अभिजीत पाटील यांनी तीन अधिवेशनामध्ये मतदारसंघातील अनेक समस्या विधिमंडळात मांडल्या आहेत. सर्वसामान्य जनतेची काम सुरळीतपणे व्हावी यासाठी जनता दरबाराचे आयोजन केले असून यातून हजारो शेतकऱ्यांचे प्रश्न समस्या सुटल्या आहेत यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे.

या जनता दरबारामध्ये पंढरपूर तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून आपापल्या समस्या, अडचणी व मागण्या मांडल्या. नागरिकांनी मांडलेल्या तक्रारी व निवेदनांचा तत्काळ निपटारा करण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख व शासकीय अधिकारी उपस्थित होते.

**तालुका कर्ज वाटप समिती नॅशनल, सहकारी तसेच खाजगी बँकेकडून घेतला आढावा**

# ॲड. संदीप कागदे यांचे कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ‘कायदा आणि समृद्ध युवा’ ह्या विषयावर व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सेळवी तालुका पंढरपूर येथे मुंबई उच्च न्यायालय येथे प्रॅक्टिस करणारे ॲड संदीप कागदे यांचे कायदा व समृद्धी युवा या विषयावर व्याख्यान संपन्न झाले प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलानाने झाली. ॲड. संदीप काकडे यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राध्यापक नागेश तिवारी यांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक जगदीश मुडेगावकर यांनी ॲड. संदीप काकडे यांचा परिचय करून दिला.




ॲड संदीप कागदे उच्चशिक्षित असून त्यांचे शिक्षण बीएससी. एलएलएम. सेट नेट ( ईील.ङ.ड्च.ड.ए.ढ.छ.ए.ढ.) आहे नुकताच त्यांनी विदेशात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या वतीने विधीतज्ञ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे तंत्र न्यायालयात मुंबई उच्च न्यायालय येथे विविधप्रकारच्या फौजदारी केसेस चालवण्याचा अनुभव आहे कायदा व शिक्षण आणि युवा सक्षमीकरण ह्या मध्ये त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

त्यानंतर ॲड संदीप काकडे यांनी कायदेविषयक विविध विषयावर अभ्यासपूर्ण व सखोल असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले त्यामध्ये प्रामुख्याने भारतीय राज्यघटना. भारतीय न्याय व्यवस्थेची रचना. व नागरिकांचे मूलभूत अधिकार. नागरिकांनी मूलभूत कर्तव्य. जनहित याचिका फौजदारी कायदे. अटकपूर्व जामीन, शैक्षणिक कायदे या विषयावर मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर जिद्द, चिकाटी, परिश्रम, सातत्य, यांच्या जोरावर आयुष्यात खूप मोठे यश संपादन करता येते असे मत ॲड संदीप काकडे यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर स्वामी विवेकानंदांच्या संकल्पनेतील युवक तसेच समाज व राष्ट्र बळकटी करण्यामध्ये युवकाची महत्त्वाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले प्राध्यापक अभिनंदन देशमाने यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक कुबेर ढोबे यांनी केले.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन श्री रोहन परिचारक यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील कर्मवीर पॉलिटेक्निकल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर श्री जी डी वाळके उपप्राचार्य प्राध्यापक जेल मुडेगावकर ट्रेनिंग ॲड प्लेसमेंट ऑफिसर प्राध्यापक मोहसीन शेख संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक राहुल पांचाळ तसेच विभाग प्रमुख डॉक्टर एस सी एम लंबे डॉक्टर एस व्ही एकलारकर प्राध्यापक अनिल बाबर प्राध्यापक दीपक भोसले ॲड सागर पाटील तसेच सर्व प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरपूर सिंहगड महाविद्यालयांमध्ये माय स्टोरी–मोटिवेशनल सेशन बाय सक्सेसफुल व्याख्यान उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोर्टी येथे दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी माय स्टोरी–मोटिवेशनल सेशन बाय सक्सेसफुल इनोवॉटर या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी यांनी दिली या कार्यक्रमाची प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून स्वप्नील पाटील (मंगळवेढा औद्योगिक वसाहत) यांनी मार्गदर्शन केले व ही व्याख्यान इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिल (श्रश्रल) सेल अंतर्गत घेण्यात आले.

श्री पाटील यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील संघर्ष, पण नाविन्यपूर्ण कल्पना राबवताना आलेल्या अडचणी, मिळवलेले यश आणि समाजासाठी केलेल्या कार्याची प्रेरणादायी अनुभव विद्यार्थ्यांसोबत शेअर केला, त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की अपयशीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे. मेहनत जिद्द आणि चिकाटी यांच्या जोरावर काही शक्य आहेया विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नवी ऊर्जा निर्माण झाली. अनेक विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून आपल्या शंका दूर केल्या या कार्यक्रमात शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला कार्यक्रमास विभागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डीजे डॉल्बीला फाटा देत पारंपारिक वाद्याचा वापर; गणपती बाप्पा मोरया गजरात विसर्जन मिरवणूक उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : डीजे डॉल्बीच्या परंपरामुळे लहान मुले व वृद्धांना त्रास होत आहे. प्रशासनाने यंदाचा गणेशोत्सव डीजे व डॉल्बीचा वापर मंडळांनी करू नये असे आव्हान प्रशासनाने केले होते. यात चांगला प्रतिसाद मिळाला व विविध मंडळांनी पारंपारिक वाद्य वापरून गणेश विसर्जन मिरवणूक काढण्यात आल्या. पंढरपूर शहरामध्ये मोठ्या उत्साहामध्ये गणेशोत्सवाचे विसर्जन पारंपारिक वाद्याने करण्यात आले. दहा दिवसांमध्ये विविध मंडळांनी धार्मिक सामाजिक कार्यक्रम ही राबवले होते.



अनंत चतुर्थीच्या मुहूर्तावर पंढरपूर शहरातील जवळजवळ ९० मंडळांनी मुख्य शहरातून मिरवणूक काढण्यात आल्या व या मिरवणुकीमध्ये डीजे व डॉल्बीचा वापर केला नाही व पारंपारिक पद्धतीने वाद्याचा वापर करून ढोल ताशाच्या गजरात अनेक मंडळांनी सजीव देखावे सादर केले होते.

कोणताही अनुचित प्रकार न घडता मिरवणूक शांततेत पार पडल्या. गणेश उत्सव मंडळांनी काढलेल्या मिरवणुकी स्वागत करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये व नाथ चौक या ठिकाणी, आमदार अभिजीत पाटील, मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, आमदार समाधान आवताडे, राष्ट्रवादी शरद पवार गटाची नेते अनिल सावंत, या सर्वांनी स्वागत मंडप उभा केली होते. यामध्ये कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले होते पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात मध्ये उत्साह निर्माण झाल्याची दिसून आले.

# पारेकरवस्ती तुपे वस्ती येथील विघ्नहर्ता गणेश मंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : इंदापूर (वनगळी) गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या गजरात वनगळी, पारेकर वस्ती व तुपे वस्ती येथील गणेश मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन उत्साहात व शांततेत पार पडले.


ईद–ए–मिलाद निमित्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सर्व मुस्लिम बांधव यांना शुभेच्छा दिल्या.


तर गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत युवक युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

मिरवणुकीत तरुण युवक युवतीं व वृद्ध महिला पुरुष यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.

विसर्जन मिरवणुकी दरम्यान कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून मंडळाच्या वतीने खबरदारी घेण्यात आली होती.

मंडळाच्या वतीने लहान मुलांच्या स्पर्धा, महिलांसाठी संगीत खुर्ची दहीहंडी स्पर्धा व करमणुकीचे विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते. आदल्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.





मंडळाच्या वतीने विसर्जनासाठी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

वनगळी, गावातील एकुण तिन गणेश मंडळाची तर पारेकर वस्ती येथील दोन गणेश मंडळाने अगदी शांतपणे मिरवणूक काढली.

गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या घोषणा देऊन बाप्पाला निरोप दिला.

**भन्ते विनयाचार्य, भन्तेगणांचा बौद्ध बांधवांशी संवाद**

# दीक्षाभूमी ते चैत्यभूमी धम्म ध्वज यात्रेचे वैरागमध्ये स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग : महाबोधी महाविहार मुक्त करा आणि बीटी क्ट १९४९ रद्द करा. या मागणीसाठी भन्ते विनयाचार्य यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या नागपूर येथील दीक्षाभूमी ते मुंबईची चैत्यभूमी या धम्म ध्वज जनसंवाद यात्रेचे सोमवारी (ता. ८) रोजी दुपारी एक वाजता वैराग शहरातील सिद्धार्थ नगर येथे पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले.

यावेळी सर्वप्रथम सिद्धार्थनगर येथील बुद्ध विहारात भंते विनयाचार्य यांच्यासह भंतेगणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर , तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांचे पूजन केले . त्यानंतर धम्म यात्रेतील सर्वांनी स्नेहभोजन घेतले.

भंते विनयचार्य यांनी दम यात्रेचा उद्देश स्पष्ट करीत उपस्थितांना धम्म प्रवचन दिले . सर्वांशी संवाद साधला .त्यानंतर पुढे हि धम्म ध्वज यात्रा बार्शीकडे मार्गस्थ झाली.

या धम्म यात्रेतील भंते विनयचार्य, भंते संघरत्न, भंते विनय कीर्ति, भंते विनय बोधि, भिक्षुणी धम्मचारणी आर्याजी यांच्या सह इतर भन्तगण उपस्थित होते .याप्रसंगी समता सैनिक दलाच्या कार्यकर्ते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते, यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि बौद्ध उपासक –उपासिका उपस्थित होते.



# इंदापूरच्या मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट या शिक्षण संस्थेला मिळाले ISO मानांकन

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराने सन्मानित मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट या नामांकित शिक्षण संस्थेला (दि.३) बुधवारी ISO ९००१:२०१५ मानांकन प्राप्त झाले आहे. प्राप्त मानांकाने शिक्षण संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.अशी माहिती संस्थेचे सचिव ॲड.समीर मखरे यांनी पत्रकारांना दिली.

हे मानांकन एक आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन प्रणाली मानक आहे, जे संस्थेच्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीची आवश्यकता दर्शवते. एक जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त मानक आहे, जे कोणत्याही संस्थेच्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीची (QMS) तपासणी करते. हे मानांकन संस्थेतील प्रक्रिया आणि व्यवस्थापन पद्धतींना अधिक प्रभावी बनवण्यासाठी मदत करते. शिक्षण संस्था प्रगती पथावर नेण्यासाठी संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत रत्नाकर मखरे व विश्वस्तांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली असून, ही संस्था शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या मोठ्या ध्येयासाठी समर्पित आहे. असे ॲड. समीर मखरे यांनी नमूद केले. ही शिक्षण संस्था शिक्षण व सामाजिक उत्थानाच्या महान ध्येयासाठी काम करते. ही शिक्षण संस्था प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा आणि दोन अनुदानित वसतिगृह चालवते, ज्यामुळे अनेक vjnt विद्यार्थ्यांना शिक्षण,उत्तम भोजनासह निवासाची संधी देते. संस्थेचे कार्य संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे, उपाध्यक्ष तानाजी मिसाळ, कार्याध्यक्ष ड.राहुल मखरे व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली अविरतपणे सुरू असल्याची माहिती ॲड. मखरे यांनी दिली.

# मराठा आरक्षणाबाबत काढण्यात आलेल्या जी. आर. रद्द करण्याच्या मागणीसाठी इंदापूर येथे ओबीसींचा महामोर्चा

## ओबीसींच्या कोठ्यातील २७ टक्के पैकी एक टक्का आरक्षण हलणार नाही, अन्यथा राज्यातला ओबीसी पेठून उठल्याशिवाय राहणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : मराठा समाजाला केंद्र सरकारने दहा टक्के आरक्षण अगोदरच दिलेले आहे. आणखी १० टक्के आरक्षण वाढवून देण्यास ओबीसींचा कसलाही विरोध नाही.परंतु ओबीसींच्या कोठ्यातील २७ टक्के पैकी एक टक्का आरक्षण हलणार नाही, अन्यथा राज्यतला ओबीसी पेठुन उठल्याशिवाय राहणार नाही.त्यामुळे सरकारने सग्या सोयर्यांसाठी काढलेला जी.आर रद्द करून ओबीसींच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा ८० टक्यांचे पिवळे वादळ मुंबईत धडकल्या शिवाय राहणार नसल्याचा इशारा पांडूरंग (तात्या) शिंदे यांनी शासनाला दिला.





मराठा आरक्षणाचा काढलेला अन्यायकारक जीआर रद्द करावा,व कुणबी समाज्याच्या सापडलेल्या नवीन ५८ लाख बोगस नोंदींची फेर चौकशी करण्यात यावी इत्यादी मागण्यांसाठी इंदापूर तालुका ओबीसी समाज्याच्या वतीने पांडूरंग (तात्या) शिंदे याचे नेतृत्वा खाली इंदापूर सावतामाळी मंदिर ते नवीन तहसिल कार्यालय ओबीसी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलताना पांडूरंग शिंदे यांनी शासनाला वरील प्रमाणे इशारा दिला.

पुढे बोलताना ते म्हणाले की,जर शासनाने ओबीसी विरोधातला जीआर रद्द नाही केला, तर आगामी होऊ घातलेल्या ग्रामपंचायत, नगरपरिषद,प.समिती, जिल्हा परिषद,महानगरपालिका, निवडणुकीत मत मागायला येणार्या उमेदवारांना पायातल बुटाड काढुन जाब विचारा, आपले आरक्षण कुठे आहे ? आमचे आरक्षण असेल तरच तुम्हाला मत, असे ठणकावून सांगा.आणि आमच्या मागण्या, आमचे म्हणणे ऐकुन घ्यायला तुम्हाला वेळ नसेल तर हा ओबीसी तुम्हाला वेळप्रसंगी खुर्चिवरून खाली खेचल्या शिवाय राहणार नाही.

गेल्या दोन वर्षापासुन मनोज जरांगे राज्यातील मराठा समाज एकत्र करून ओबीसींमधुन आरक्षण मागत आहे.यांना ओबीसींमधून आरक्षण का पाहिजे ? येणार्या सर्व निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कुनबी बोगस दाखल्यांच्या माध्यमातुन मराठा समाजाला राजकीय पोळी भाजुन घेण्यासाठी यांना आरक्षण हवे आहे.शासनानेही लक्षात ठेवले पाहिजे की,आमच्या पोराबाळांच्या शिक्षणावर,राजकारणावर जर कोणी घाव घालु पहात असेल तर राज्यातील ८० टक्के ओबीसी समाज अख्खी मुंबई चक्का जाम केल्या शिवाय राहणार नसल्याचे पांडूरंग शिंदे म्हणाले.

याप्रसंगी ओबीसी नेते नवनाथ पडळकर, समता परिषद पुणे जिल्हाध्यक्ष आणील लडकत, बाबासाहेब बोंग, एड.नितीन राजगुरू, एड.नितीन राऊत, एड.गिरीष पाटील, एड.सचिन करे,एड.सचिन राऊत, मा.नगराध्यक्ष नलिनी शिंदे, अनिता खरात, माधवी सोननीस, कल्पना बोराटे, मिनाक्षी शिंदे, कल्पना शिंदे, राजेश शिंदे, किरण गोफणे, शिवाजी सातव, संजय शिंदे, रमेश राऊत, रमेश शिंदे, सुनिल राऊत, गोकुळ व्यवहारे, राजु गार्डे, अशोक देवकर, गणेश जाधव, अक्षय शिंदे, विकास शिंदे, अमोल राऊत, पांडूरंग राऊत, दिगांबर राऊत इत्यादी प्रमुख उपस्थित होते.

# भाषा तुमच्या श्वासात रुजून येते : गीतकार अशोक बागवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सरस्वतीच्या मंदिराचे दरवाजे हे माणसाच्या खांद्याएवढे आहेत तिथे वाकुनच जावे लागते.भाषा तुमच्या श्वासात रुजून येते.मी मराठी भाषेत आणि महाराष्ट्रात जन्माला आलो हे माझे भाग्य समजतो. स्व.उगावकर यांच्याशी माझा स्नेह होता,त्यांच्या नावाने पुरस्कार मिळाला हे माझं भाग्य आहे.पुरस्काराचा अर्थ जोखीम आहे.यापुढे अजून चांगले काम करा हा अर्थ असल्याने आमची जबाबदारी वाढली असल्याचे प्रतिपादन गीतकार अशोक बागवे यांनी केले.




**स्व.गीतकार राम उगावकर राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार सोहळा**

निफाड येथे श्री माणकेश्वर वाचनालयाच्या वतीने दिला जाणारा स्व.गीतकार राम उगावकर राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार गीतकार अशोक बागवे यांना सेवानिवृत्त पोलीस महानिरीक्षक बी.जी. शेखर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे,राजेंद्र राठी,सचिन होळकर, व वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार,संजय करंजकर, ड अंजली उगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी वाचनालयाच्या १०६ वर्षाच्या वाटचालिबाबत प्रास्तविकातून माहिती दिली.कवी राजेंद्र सोमवंशी यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. परिचय महेश बनकर यांनी करून दिला याप्रसंगी माजी प्राचार्य बी. आर सोनवणे , वसंत सुपारे , स्मिता फडणीस या शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला त्याचप्रमाणे एमपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या ऋषिकेश खालकर ,आदित्य जाधव, सागर अहिरे, सुमित भोई, चेतन कर्वे ,शुभम धारराव ,रितिक परदेशी ,गौरव सानप, मयूर वन्से या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला

याप्रसंगी शिवाजी ढेपले, कवी प्रकाश होळकर,कवी लक्ष्मण महाडिक, कवी संदीप जगताप, कवी संजय आहेर, डॉ.किरण राठी,मधुकर राऊत, गुलाब टकले, हेमंत धारराव,ड श्रीकांत रायते,संजय कुंदे,संपत डुंबरे, मालती वाघावकर, सीमा भांडारकर, चंद्रकांत सांगळे, दीपक आहेर ,संपत कराड ,बाबासाहेब सोमवंशी ,संजय घुमरे ,अशोक पगारे ,ड खैरे , एस एम सोनवणे ,ड कराड आदींसह वाचनालयाच्या उपाध्यक्षा मेघा जंगम ,हिशोब तपासणीस दत्ता उगावकर ,सहचिटणीस राहुल दवते ,संचालक सुजाता तनपुरे ,तनवीर राजे, राजेंद्र खालकर ,सुनील चिखले ,बाळासाहेब कर्डिले ,आदीसह गुणवंत विद्यार्थी वाचक उपस्थित होते. सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र सोमवंशी यांनी केले

# श्रीनगरमधील अशोक स्तंभाच्या तोडफोड प्रकरण – भारत शांततेचा देश, धार्मिक नाही : ॲड. आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी जम्मू-काश्मीरमधील श्रीनगरमध्ये भारताचे राष्ट्रीय चिन्ह असलेल्या अशोक स्तंभाची तोडफोड झाल्याच्या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.

त्यांनी आपल्या अधिकृत 'द' (पूर्वीचे ट्विटर) हँडलवरून या घटनेवर भाष्य करताना, हे राष्ट्रीय चिन्ह सर्व भारतीयांचे असून, अशा कृतींमुळे मुस्लीम समाज देशात स्वतःला वेगळं पाडत असल्याचं म्हटलं आहे. तसेच ड. आंबेडकर यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटलं आहे, मी श्रीनगरमध्ये भारताचं राष्ट्रीय चिन्ह - अशोक स्तंभ - तोडल्याची तीव्र निंदा करतो. राष्ट्रीय चिन्ह हे भारतातील सर्व नागरिकांसाठी आहे; ते एखाद्या व्यक्ती किंवा गटाचं नाही तर संपूर्ण राष्ट्र आणि तिथल्या लोकांचं प्रतिनिधित्व करतं!

त्याचप्रमाणे या घटनेला पाठिंबा देणाऱ्यांवरही त्यांनी जोरदार टीका आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय चिन्हाची तोडफोड करून आणि त्याला पाठिंबा देऊन, मुस्लीम स्वतःला आणि संपूर्ण समाजाला भारतात वेगळं पाडत आहेत, असं त्यांनी ट्विटमध्ये नमूद केलं.

ॲड. आंबेडकर यांनी मुस्लीम समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. मुस्लिमांनी हे समजून घेतलं पाहिजे की, भारत दार-उल-अमन आहे, दार-उल-इस्लाम नाही! या वाक्याद्वारे त्यांनी भारताची ओळख शांतताप्रिय राष्ट्र अशी आहे, धार्मिक राष्ट्र नाही, यावर भर दिला आहे.

# रमझान शेख यांच्या नेतृत्वाखाली वोट चोरीविरोधात स्वाक्षरी मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सध्या देशभरात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उचललेले वोट चोरी विरुद्धचे पाऊल लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते आमदार जितेंद्र आव्हाड तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांच्या नेतृत्वाखाली जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयांमध्ये मोठ्या संख्येने एकत्र येऊन वोट चोरीविरोधात स्वाक्षरी

**वोट चोरीविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेसचे स्वाक्षरी अभियान**

करून आपला ठाम निषेध नोंदविला. या अभियानाच्या माध्यमातून लोकशाहीचे संरक्षण आणि जनतेचा विश्वास टिकवून ठेवणे हाच पक्षाचा उद्देश आहे लोकशाही मजबूत राहण्यासाठी जनतेचा प्रत्येक मताचा अधिकार




अबाधित राहणे गरजेचे आहे. वोट चोरी हा लोकशाहीवरचा घातक प्रहार असून त्याविरोधात प्रत्येक कार्यकर्त्याने लढा दिला पाहिजे. असे यावेळी रमझान शेख यांनी सांगितले.

**केंद्रीय मंत्री डॉ. रामदास आठवले यांचे मत**

# दलितांवरील हल्ले कमी होण्यासाठी आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दलितांवरील अन्याय अत्याचार कमी होण्यासाठी आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले जाईल असे मत केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी मांडले आहे.

बुलढाणा येथील विश्राम गृह येथे ७ सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांनी संबोधित करतांना सांगितले की, जिल्ह्यात दलितांवर जो अन्याय किंवा हल्ले होत आहे. यावर सर्वात मोठा उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह आहे. त्याचा अवलंब मोठ्या प्रमाणात झाला पाहिजे यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून देशभर आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले जाईल. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी जो लढा दिला त्याला यश मिळाले आहे. त्यामुळे मोठ्या कालाविधीनंतर मराठा समाजाला आरक्षणासाठी लढणारा नेता मिळाला आहे. महायुतीच्या सरकारने मराठा समाजाला देवेंद्र फडणवीस यांनी कायद्यात बसविणारे आरक्षण दिले आहे. त्यामुळे आतापर्यंत जे मराठा समाजाचे मुख्यमंत्री झाले त्यांना आरक्षण देता आले नाही



पण ब्राम्हण मुख्यमंत्री असणाऱ्या देवेंद्र फडणवीसांनी आरक्षण दिले. ओबीसी समाजाचा आरक्षणाचा हक्क हिरावून घेतला नाही. तर मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे कोणाच्याही आरक्षणाला धक्का बसणार नाही असे आरक्षण दिले.

काँग्रेसने ओबीसी समाजाचे फसवणूक केली आहे. त्यांचे सरकार असताना त्यांनी जातीय जनगणना केली नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तो निर्णय घेतला आहे. विदर्भाचा विकास झाला पाहिजे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी नदीजोड प्रकल्पाच्या व इतर माध्यमातून झाले पाहिजे.

एमआयडीसीची जमिन मोकळी न राहता ती कामात आली पाहिजे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करणार आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी एक वेळ सरकारला याबाबत माहिती दिली पाहिजे. कारण यामुळे त्यांच्या काय मागण्या आहेत. त्या मागण्या मार्गी लागू शकतात. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका महायुती म्हणून एकत्र लढणार आहे. त्यामुळे महायुतीत जेथे निवडून येणार आहे. तिथे आरपीआय चा उमेदवार दिला जाईल. तसेच महाराष्ट्रातील ज्या गायरान जमीनीवर अतिक्रमण केले आहे त्यांचे अतिक्रमण कायम व मालकी हक्काचे झाले पाहिजे त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.

तसेच दोन महामंडळ व राज्यमंत्रीमंडळातील रिक्त असलेल्या मंत्रीपदाची मागणी केली आहे. आरपीआयच्या कार्यकर्त्यांसाठी सत्तेत वाटा मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी बुलढाणा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड, आरपीआयचे प्रदेश कार्याध्यक्ष बाबूराव कदम, आरपीआयचे जिल्हा संपर्कप्रमुख बाबासाहेब जाधव, प्रदेश उपाध्यक्ष रमेश मकासरे, राज्यध्यक्ष मातंग आघाडी अण्णा वायदंडे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार, रिपाई चे बुलढाणा नेते सतीश बोर्डे मरावडानेचे नेते बाळकृष्ण इंगळे देवेंद्र रणपिसे व इतर पदधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# कुरणेवाडी ग्रापंच्या उपसरपंचपदी नरहरी आटपाडकर यांची बिनविरोध निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वरकुटे मलवडी/प्रतिनिधी : कुरणेवाडी ता माण येथील ग्राम पंचायत उपसरपंच रिक्त पद असल्याने त्या उपसरपंच पदाची निवड करण्यासाठी दि ०८ रोजी ग्राम पंचायत कार्यालयात विशेष सभा बोलावण्यात आली. यावेळी नरहरी तुकाराम आटपाडकर यांचा एकमेव अर्ज सादर करण्यात आला. यावेळी नरहरी तुकाराम आटपाडकर यांची उपसरपंच म्हणून बिनविरोध निवड झाली. त्यावेळी फटाक्याची आतषबाजी करत आनंद व्यक्त करण्यात आला.त्या सभेचे अध्यक्षस्थान शालन बनसोडे यांनी भूषविले तर जयदीप बनसोडे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तर सचिन शिंदे यांनी सहाय्यक निरीक्षक म्हणून काम पाहिले . तर ग्राम पंचायत कर्मचारी भीमराव बनसोडे यांनी सहकार्य केले या निवडणुकीसाठी सविता वजीर खाडे ह्या सूचक म्हणून लाभल्या तर शोभा शिवाजी आटपाडकर यांनी अनुमोदन दिले. यावेळी ग्रा पं सदस्य म्हाकु मिसाळ, दादासो आटपाडकर , उपस्थित होते यावेळी कुरणेवाडी तील दादा आटपाडकर चांगदेव आटपाडकर, विलास आटपाडकर जगन्नाथ आटपाडकर ,बाबा आटपाडकर सुभाष आटपाडकर बजरंग आटपाडकर पोपट आटपाडकर प्रशांत आटपाडकर सचिन आटपाडकर सीताराम आटपाडकर सुखदेव आटपाडकर भीमराव आटपाडकर अक्षय आटपाडकर आदी मान्यवर उपस्थित होते. नूतन उपसरपंच नरहरी तुकाराम आटपाडकर यांचे माण खटाव चे नेते अभयसिंह जगताप, प्रभाकर देशमुख अनिल देसाई यांनी अभिनंदन केले, या निवडीबद्दल सर्वच स्तरातून सत्कार व अभिनंदन करण्यात आले.